**नियमीत दिवाणी दावा क्र.126/2017 मधील निशाणी 20 व 22 खालील एकत्रित आदेश**

1. प्रतिवादी क्र. 1 व 2 तसेच 3 व 4 यांनी सदरच्या अर्जाद्वारे अशी विनंती केली आहे की प्रतिवादींना कैफियत व जबाब दाखल करणेस झालेला विलंब माफ व्हावा व कैफियत तसेच जबाब दाखल करून घेणेचा हुकुम व्हावा.

2. प्रतिवादींनी त्यांच्या अर्जात असे म्हंटले आहे की कैफियत दाखल करणे कामी आवश्यक व महत्वाचे कागदपत्र मिळविण्यास तसेच सदर कागदपत्रे वकीलांना देण्यास उशिर झाला. त्यामुळे प्रतिवादी समन्स बजावल्यानंतर 30 दिवसांच्या आंत सदर कैफियत दाखल करू शकले नाही. प्रतिवादींचा मुद्यामहून कैफियत उशिराने दाखल करणेचा उद्येश नव्हता त्यामुळे कैफियत दाखल करून घेणे गरजेचे आहे.

3. उलटपक्षी वादीच्या वकीलांनी अर्ज कायदेशीर नाही, नमूद केलेले कारण योग्य नाही असे म्हणणे मांडून अर्ज खर्चासह रद्य होणेची विनंती केली आहे.

4. सदर खटल्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रतिवादींना समन्सची बजावणी झाल्यानंतर प्रतिवादी दिनांक 29.09.2017 रोजी वकीलांसह हजर झाले. परंतू त्यानंतरही प्रतिवादी कैफियत दाखल करू शकले नाही.

5. सदरचा दावा वाटप, जाहीर ठरावासाटी व निरंतरचे ताकिदीसाठी दाखल केला आहे. त्यामुळे दाव्याचे अवलोकन करता दावा कायदेशीरपणे चालवून निकाली निघण्यासाठी, प्रतिवादींना दाव्याचा प्रतिकार करण्यासाठी कैफियत तसेच जबाब दाखल करण्याची संधी देणे योग्य होईल असे मला वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

-: **आदेश** :-

प्रतिवादी क्र. 1 व 2 यांचा अर्ज रूपये 200/- तसेच प्रतिवादी क्र. 3 व 4 यांचा अर्ज रूपये 200/- च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो व कैफियत स्विकारण्यात येते.

( सुधीर न. शिंदे )

दिनांक :13.03.2018

दिवाणी न्यायाधीश, क-स्तर, येवला